# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २३/०६/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## खून

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत ०१ कि. मी अंतरावरील शिवाजीनगर, तिडके कॉलेज रोड, मौदा येथे दिनांक २१/०६/२०२२ चे ०८.१५ वा. ते ०९.०० वा. दरम्यान फिर्यादीची मुलगी/पीडिता टयुशन क्लासेस, मौदा येथे नेहमीप्रमाणे सकाळी ०८.१५ वा. टयुशन जाते व १०.३० वा. घरी परत येते. फिर्यादीची मुलगी टयुशनला जाते म्हणून दिनांक २१/०६/२०२२ रोजी ०८.१५ वा. टयुशनला गेली. परंतू ती ११.०० वा. पर्यंत घरी परत आली नाही. त्यामुळे फिर्यादी यांनी आपले पतीला फोन करून तीच्या बाबत माहिती दिली. फिर्यादीचे पतीने म्हटले की, ति मैत्रिणीकडे गेली असेल, यावरून तिची मैत्रिणीकडे विचारपूस केली असता तिने सांगितले की, ति क्लासला आली व गणिताचा क्लास करून निघून गेली. त्यानंतर पीडिता घरी परत न आल्याने नातेवाईक तसेच वर्ग मित्र, मैत्रिणी यांचेकडे शोध घेतला असता, तिच्या क्लासची मुलगी हिने सांगितले की, पीडिता हिला फुस लावून धीरज शेंडे, रा. भामेवाडा याने त्याचे सोबत मोटार सायकलवर गेल्याचे सांगितले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून सदर गुन्हयाचा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचे तपासात यातील आरोपी नामे– धिरज सुरेश भोंडे, वय १९ वर्ष, रा. भामेवाडा ता. मौदा, जि.नागपूर याने दिनांक २१/०६/२०२२ रोजी पीडिता हिला टयुशन क्लासेस येथून सकाळी ०९.०० वा. आपल्या मोटार सायकल वर बसवून भामेवाडाच्या दिशेने साळव्या गावाच्या जंगल, ता.कुही येथील जंगलात घेवुन गेला. त्याठिकाणी आरोपीने तिच्या सोबत शारीरिक संबंध केले. त्यानंतर सायंकाळी अंदाजे ०४.०० वा. दरम्यान तिचे दुस–या मुलासोबत प्रेम संबंध असल्याचे संशयावरून आरोपी व पीडितामध्ये झगडा भांडण झाले. त्यात आरोपीने त्याचे जवळ असलेल्या चाकुने रागाच्या भरात तिच्या गळयावर व पोटावर वार करून तिचा खुन केला व पुरावा नष्ट करण्याचे दृष्टीने तिला साळव्याच्या जंगलात मारून फेकून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३, ३०२, २०१, ३७६ (३), ३७६ (अ) भादंवि. सहकलम ४, ६ बा.लै.अ.प्र.का. २०१२ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे, पोलीस स्टेशन, मौदा. मो.नं. ९९२३४३८३५५ हे करीत आहे.

## गैरकायद्याची मंडळी जमवुन शासकीय कामात अडथळा निर्माण करून खुन करण्याचा प्रयत्न

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत १८ कि.मी अंतरावरील मांडवा शिवार येथे दिनांक २३/०६/२०२२ चे ०१.४५ वा. ते ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी पोउपनि बट्टुलाल रामलोटन पांडे वय ५४ वर्ष नेमणूक पोलीस स्टेशन उमरेड हे पोलिस नाईक तिलक रामटेके, पोलिस नाईक प्रदिप चवरे यांचेसह शासकीय वाहण डायल ११२ क्रमांक एमएच–१२/एसक्यु–१९७५ ने उमरेड शहरात रात्रगस्त करीत असतांना सहा चाकी कन्टेनर चे कॅबीन मधुन एका इसमाने एक पांढऱ्या रंगाचा बोरा बाहेर फेकल्याने संशयीत कन्टेनरला स्टॉफने थांबविण्याचा इशारा केला असता कन्टेनर चालकाने आपले ताब्यातील कन्टेनर वेगाने पळविल्याने सदर कन्टेनरचा संशय आल्याने डायल ११२ वाहनाने कन्टेनर चा पाठलाग केला. कन्टेनर चालकाने आपला कन्टेनर थांबवुन कन्टेनर रिव्हर्स घेवुन डायल ११२ वाहणाला समोरून धडक देवुन वाहणाचे नुकसान करून कन्टेनर मधुन ०५ ते ०६ ईसम वय अंदाजे २५ ते ३५ वयोगटातील लोखंडी रॉड व ईतर हत्यार घेवुन कन्टेनर चे कॅबीन मधुन उतरून फिर्यादीस जिवे मारण्याचा उद्येशाने फिर्यादीचे जवळ येवुन फिर्यादीचे डोक्यावर लोखंडी रॉडने वार केला असता फिर्यादीने हात आडवा केला सदर लोखंडी रॉडचा वार हातावर लागला. तसेच फिर्यादीचे दोन्ही पायांवर सुध्दा जबर दुखापत केली तसेच पोना प्रदीप चवरे यास पाठीवर मारहाण केल्याने पाठीला मुका मार लागलेला आहे. यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी तयार करून शासकीय काम करीत असतांना शासकीय कामात अडथळा निर्माण करून डायल ११२ वाहनास धडक देउन जिवे मारण्याच्या उददेशाने लोखंडी रॉड व इतर हत्याऱ्याने मारहाण करून गंभीर जखमी केले. आरोपी हे कन्टेनर वाहनाने पडुन गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३५३, ३३२, १४३, १४८, १४९ भांदवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. राजेश पाटील मो.क्र. ९०४९९८९३४१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**